# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक : २५६०११८१-८२
फॅक्स : ०२०–२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
ई–मेल : regis@unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे-४११००७.

## विद्यापीठ परिपत्रक

**R/2/103** दिनांक : १४ ऑक्टोबर २०२५

**विषय : सर्व महिला विद्यार्थी, महिला शिक्षक व महिला शिक्षकेतर कर्मचारी यांची "स्वयंसिद्धता पोर्टल" वर नोंदणी करणेबाबत----**

उपरोक्त विषय व शासन आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की आपल्या विभागातील व कार्यालयातील सर्व महिला विद्यार्थी, महिला शिक्षक तसेच महिला शिक्षकेतर कर्मचारी (कंत्राटी कर्मचाऱ्यांसह) यांनी www.strishakti.org
या संकेतस्थळाद्वारे "स्वयंसिद्धता पोर्टल" वर आपली नोंदणी गुरुवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत करणे अनिवार्य आहे.

**स्वयंसिद्धता पोर्टल विषयी माहिती :**
"स्वयंसिद्धता पोर्टल" हे महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाने सुरू केलेला एक उपक्रम असून, या माध्यमातून जागरूकता, क्षमता विकास, विविध शासकीय योजना, प्रशिक्षण कार्यक्रम आणि सहाय्य सेवा यांचा लाभ महिलांना मिळवून देण्यासाठी हे एक व्यापक डिजिटल व्यासपीठ म्हणून कार्य करते. या पोर्टलचा उद्देश शिक्षण आणि व्यावसायिक क्षेत्रात महिलांच्या सुरक्षिततेला, नेतृत्वगुणांना आणि सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणे हा आहे.

**नोंदणीसाठी संकेतस्थळ :🔗www.strishakti.org**
सर्व विभागप्रमुख आणि कार्यालयप्रमुख यांना सूचित करण्यात येते की आपल्या विभागातील सर्व महिला विद्यार्थी, महिला शिक्षक व महिला शिक्षकेतर कर्मचारी (कंत्राटी कर्मचाऱ्यांसह) यांची नोंदणी वरील संकेतस्थळावर गुरुवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुख व कार्यालयप्रमुख यांची राहील.
शैक्षणिक विभागातील IQAC समन्वयक यांनी नोंदणी प्रक्रियेस आवश्यक ती मदत व देखरेख करून विभागप्रमुखांना सहकार्य करावे.

कळावे,

प्रा. डॉ. ज्योती भाकरे
प्रभारी कुलसचिव

**नोंदणी प्रक्रियेचा मार्गदर्शक व्हिडिओ :**
🎥https://www.youtube.com/watch?v=Q1dck0ATW9c